आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१ डिसेंबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात; विरोधी पक्षांच्या घोषणाबाजीनंतर लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूूब

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही निवडणुका पुढे ढकलण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला राजकीय पक्षांचा विरोध

- सोलापूर मधे रस्ते अपघातात पाच जणांचा मृत्यू

**आणि**

- सुलतान अजलान शाह हॉकी स्पर्धेत बेल्जियमकडून भारताचा पराभव

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली आणि पहिल्याच दिवशी कामकाजात अडथळे आले. विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत केलेल्या घोषणाबाजीमुळे संसदेचं कामकाज आधी दुपारी १२, नंतर दुपारी २ वाजेपर्यंत आणि अखेर दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत आज कामकाज सुरू झालं तेव्हा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, निवृत्त कर्नल सोना राम चौधरी, प्राध्यापक विजय कुमार मल्होत्रा आणि रवी नाईक यांना श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. यावर बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली आणि कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन केलं. बिर्ला यांच्या आवाहनानंतरही घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे सभापतींनी दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झालं तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक, केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ सादर सभागृहात सादर केली. मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक लोकसभेत आवाजी

मतदानाने मंजूर करण्यात आलं. विरोधी पक्षांची घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे कामकाज तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत आज ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे गुरविंदर सिंग ओबेरॉय, चौधरी मोहम्मद रमजान आणि सज्जाद अहमद किचलू यांनी वरिष्ठ सभागृहात सदस्य म्हणून शपथ घेतली. पहिल्यांदाच राज्यसभेचे अध्यक्षपद भूषवणारे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांचं स्वागत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो असं मोदी यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना भारतीय लोकशाहीविषयी मोदी म्हणाले....

**होल्ड... बाईट - प्रधानमंत्री**

त्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे राज्यसभेचं कामकाजही २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठीच्या निवडणुकीसाठी प्रचार करण्याचा आज शेवटचा दिवस असल्यानं प्रचार शिगेला पोहोचला आहे. विविध पक्षांचे नेते मतदारांचा कौल मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. आज रात्री १० वाजता हा प्रचार संपेल.

दरम्यान, राज्यातल्या काही मतदारसंघांमधल्या निवडणुकांबाबत काही जणांनी न्यायालयात धाव घेतल्यानं इथल्या निवडणुका पुढं ढकलायचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. हा निर्णय चुकीचा आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. हा निर्णय इतर उमेदवारांवर अन्याय करणारा असून तो कायद्याला धरून नाही, असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हा निर्णय चुकीचा असल्याचं मत व्यक्त केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या निर्णयावर टीका केली. मतदान एका दिवसावर आलेलं असताना २० नगरपालिका आणि काही प्रभागांमधल्या निवडणुका पुढं ढकलायचा निर्णय आश्चर्यकारक आणि अनाकलनीय असून आयोगाचा भोंगळ कारभार सुरू आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.

नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या उद्या होणाऱ्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज आहे. नंदुरबार जिल्ह्यातल्या चार नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी आज निवडणूक पथकं आपापल्या मतदान केंद्रांवर रवाना होत आहेत.

दरम्यान, सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वर आणि फलटण पालिकेची निवडणूक, तसंच मलकापूर पालिकेतल्या २ ठिकाणी न्यायालयाच्या निर्णयानुसार २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर अकोला जिल्ह्यातल्या अकोट तालुक्यातल्या प्रभाग ४ ची निवडणूक उमेदवाराचा मृत्यू झाल्यानं स्थगित करण्यात आली आहे.

<><><><><>

भारत केवळ आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेनेच नव्हे तर जागतिक पातळीवरही महत्त्वाची आर्थिक भूमिका बजावत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत पादत्राणे डिझाईन आणि विकास संस्थेच्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या. देशाच्या आर्थिक प्रगतीत पादत्राण निर्मिती उद्योगाचा मोठा वाटा असून गेल्यावर्षी तब्बल ५०० कोटी अमेरिकन डॉलर किंमतीच्या पादत्राणांची निर्मिती झाली असल्याचंही त्या म्हणाल्या.

<><><><><>

देशातल्या मनोरंजन आणि माध्यम जगात खूप क्षमता आहे. त्यांचा सुयोग्य वापर होण्याची गरज केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी आज व्यक्त केली. मुंबईत सीआयआय बिग पिक्चर समिटमध्ये ते बोलत होते. जागतिक बाजारपेठेत भारताची हिस्सेदारी केवळ २ टक्के आहे. यासंधीचा लाभ घेण्याचं आवाहन त्यांनी उद्योगाला केलं. देशातल्या मनोरंजन उद्योगावर १ कोटीहून अधिक लोकं अवलंबून आहेत. AI आधारित गाणी आणि व्हिडीओ या क्षेत्रातली गणितं बदलत असताना आपणही नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात बार्शी-लातूर महामार्गावर झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. विवाह सोहळ्यानंतर नवदाम्पत्याला देवदर्शनासाठी तुळजापूरला घेऊन जाणारी कार आणि भरधाव ट्रक यांची

धडक होऊन हा अपघात झाला. ही धडक इतकी जोरदार होती, की कार पुलावरून खाली जाऊन तीन ते चारवेळा पलटी झाली. अपघातात दोन्ही वाहनांचं मोठं नुकसान झालं.

<><><><><>

दितवाह चक्रीवादळाचा जोर ओसरून त्याचं कमी दाबाच्या पट्ट्यात रुपांतर झालं असून ते बंगालचा उपसागर आणि उत्तर तामिळनाडू तसंच पुद्दुचेरीच्या किनारी भागाकडे झुकलं आहे. गेल्या सहा तासात हे चक्रीवादळ दहा किलोमीटर प्रती तासाच्या गतीने उत्तरेकडे सरकलं असून  ते चेन्नईपासून दक्षिणेकडे ९० किलोमीटर, पुद्दुचेरीपासून दक्षिणेकडे ९० किलोमीटर आणि कुड्डलोर आणि कराईकलपासून शंभर किलोमीटर अंतरावर आहे. कमी दाबाचा पट्टा उत्तर तामिळनाडू आणि पुद्दुचेरीपासून समांतर अंतरावर तीस किलोमीटरवर असेल. यामुळे तिरूवलुर जिल्ह्यात आज जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

<><><><><>

मलेशियामधल्या इपोह इथं झालेल्या सुलतान अजलान शाह हॉकी स्पर्धेत बेल्जियमकडून १-० असा पराभव झाल्यानंतर भारताला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. या सामन्यात बेल्जिमयच्या थिब्यू स्टॉकब्रोक्स याने एकमेव गोल केला. सहा वर्षाच्या प्रतीक्षेनंतर भारताचा संघ सुलतान अजलान शाह स्पर्धा खेळला. २०१९ मधे झालेल्या स्पर्धेतही भारताचा कोरियाकडून पराभव झाला होता. भारत या स्पर्धेत आतापर्यंत पाच वेळा विजेता ठरला आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात काल रांची इथं झालेल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण अफ्रिकेचा १७ धावांनी पराभव केला. भारतानं प्रथम फलंदाजी करताना पन्नास षटकात ३४९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेला ३३२ धावांवर रोखण्यात भारताला यश आलं.

<><><><><>

राजस्थान इथं सुरु असलेल्या विद्यापीठस्तरीय पाचव्या खेलो इंडिया स्पर्धेत काल महाराष्ट्रानं एक सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्य पदकं जिंकली. सायकलिंगमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिद्धी शिर्के आणि मंगेश ताकमोगे यांनी पाच फेऱ्यांच्या

एलीट शर्यतीत सुवर्णपदक पटकावलं. कोल्हापूर विद्यापीठाच्या सायली आरंडेनं सायकलिंग ट्रॅक स्पर्धेत दोन कांस्य पदकं मिळवली, तर महिलांच्याच स्क्रॅच प्रकारात पुणे विद्यापीठाच्या आदिती डोंगरेनं रौप्य पदक जिंकलं.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील दत्तवाड-सदलगा मार्गावर असलेल्या दुधगंगेच्या नदीपात्रात आज मगरीने ओढून नेल्याने एका बँक कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. दत्तवाड येथील जिल्हा बँकेचे कर्मचारी असलेले लक्ष्मण कलकी आज सकाळी दूधगंगा नदीच्या पात्रात आंघोळीसाठी गेले असता एका महाकाय मगरीनं त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी आज बुलडाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या प्रांगणात जनजागृतीपर पथनाट्य सादर केलं. या जनजागृती कार्यक्रमांमध्ये बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कर्नाटकमधे विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे येईल, असं हवामान विभागाने कळवलं आहे.

**//<><><><><>//**